# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २८.०५.२०२६ गुरूवार**

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे कळमना :— जिवे ठार मारणाऱ्या आरोपीस अटक.**

पोलीस ठाणे कळमना हद्दीत, प्लॉट नं. ७७, बलराम आटा चक्की जवळ, विजय नगर, कळमना, नागपुर येथे राहणारे फिर्यादी भुजबळ उर्फ रामप्रसाद छोटु चंद्रलेख, वय ५५ वर्षे यांचा मुलगा नामे दिपक उर्फ भोला, वय २२ वर्षे हा लहानपणापासुन गतीमंद असल्याने काहीही कामधंदा करीत नव्हता व बाहेर विनाकारण फिरत असुन, गांजा व सिगारेट चा व्यसनी होता. कळमना जुनी वस्ती, प्लॉट नं. ०३, हनुमान मंदीर जवळ राहणारा अमोल उर्फ सलमान लक्ष्मण वाघमारे, वय ३१ वर्षे हा त्याचा मित्र असुन दोघेही नेहमी सोबत राहत होते व व्यसनी होते. दिनांक २७.०५.२०२६ चे १६.०० वा. ते दि. २८.०५.२०२६ चे १०.०० वा. चे दरम्यान, फिर्यादीचा मुलगा व त्याचा मित्र अमोल दोघेही अमोल याचे घराचे छतावर सोबत असतांना त्यांचेमध्ये कोणत्यातरी कारणावरून वाद झाल्याने, आरोपी अमोल उर्फ सलमान याने फिर्यादीचा मुलगा दिपक उर्फ भोला यांस दगड व विटांनी त्याचे डोक्यावर मारून जिवानिशी ठार केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे मपोउपनि. प्रेरणा काळे ९९२११३६३१९ यांनी आरोपीविरूध्द कलम १०३(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करुन, त्वरीत दखल घेऊन, आरोपींचा शोध घेऊन, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे नंदनवन :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २८.०५.२०२६ चे १४.३५ वा. चे सुमारास, नंदनवन पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, हसनबाग पोलीस चौकी रोड, नंदनवन कॉलोनी येथे एका ईसमावर संशय आल्याने त्यास थांबवुन, त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव शहबाज खान शेर खान, वय २५ वर्षे, रा. हसनबाग मोठी मस्जीद जवळ, नागपुर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आंत कमरेत ०१ लोखंडी चाकु किंमती ५००/—रू. चा मिळुन आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन संशयीतरित्या फिरतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोहवा. आशिष तितरमारे यांनी दिलेल्या तक्रारीवरून, पोलीस ठाणे नंदनवन येथे मपोउपनि. रूपाली सपकाळ यांनी आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे पाचपावली :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता कोंडुन ठेवणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २८.०५.२०२६ चे ०२.४० वा. ते ०३.५० वा. चे दरम्यान, पाचपावली पोलीसांचे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, त्यांनी सलीम स्पोर्ट्स ग्राऊंडचे मागे, बुध्द नगर, युनिट क्र. २ चे गल्लीत, भोलानाथ यादव चे

टिनाचे शेडमध्ये पाहणी केली असता, त्याठिकाणी ०५ गोवंशीय लहान मोठी जनावरे यांना अत्यंत क्रुरपने व निर्दयतेने दाटीवाटीने कोंडून चारापाणी न देता कत्तलीकरीता बांधून ठेवल्याचे दिसुन आले. नमुद जनावरांचे मालकाबाबत माहिती काढली असता, पाहीजे आरोपी शाकीब कुरेशी उर्फ गोलु, रा. टेका वस्ती, पाचपावली, नागपुर याने नमुद गोवंशीय जनावरे यांना अवैधरित्या कत्तलीकरीता बांधुन ठेवल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळावरून एकुण ०५ गोवंशीय जनावरे एकुण किंमती २,३०,०००/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. गोवंशीय जनावरे यांना गोरक्षण, धंतोली, नागपुर येथे दाखल करण्यात आले आहे. पोलीस ठाणे पाचपावली येथे आरोपीविरूध्द कलम ५, ५(ब)(क), ९(ब) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम—१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११(च)(छ) प्राणी क्रुरता अधिनियम—१९६० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सुरू आहे.

**४) पोलीस ठाणे सदर :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता कोंडुन ठेवणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २७.०५.२०२६ चे २३.२० वा. चे सुमारास, सदर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, त्यांनी गड्डीगोदाम, लाल शाळेचे मैदानात पाहणी केली असता, त्याठिकाणी ०७ गोवंशीय लहान मोठी जनावरे यांना अत्यंत क्रुरपने व निर्दयतेने दाटीवाटीने कोंडून चारापाणी न देता कत्तलीकरीता बांधून ठेवल्याचे दिसुन आले. नमुद जनावरांचे मालकाबाबत माहिती काढली असता, कोणतरी अज्ञात आरोपीने नमुद गोवंशीय जनावरे यांना अवैधरित्या कत्तलीकरीता बांधुन ठेवल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळावरून एकुण ०७ गोवंशीय जनावरे एकुण किंमती १,२०,०००/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. गोवंशीय जनावरे यांना गोरक्षण, धंतोली, नागपुर येथे दाखल करण्यात आले आहे. पोलीस ठाणे सदर येथे आरोपीविरूध्द कलम ५, ५(ब), ९, ९(ब) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम—१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ३, ११(१), प्राणी क्रुरता अधिनियम—१९६०, सहकलम ११८, ११९ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे यशोधरानगर :—** दिनांक २८.०५.२०२६ चे ११.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, भिलगांव, परशुराम चौक, मॉ. शारदा को—ऑप. सोसायटी मधील अर्धवट बांधकाम झालेल्या बिल्डींगचे पहील्या माळ्यावर एक अनोळखी पुरुष ईसम अंदाजे ३० ते ३५ वर्षे वयाचे, रंग सावळा, उंची ५ फुट ६ इंच, अंगात पांढऱ्या व कत्थ्या रंगाचा बारीक चेक्स चा फुल शर्ट व निळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट, ऑरेंज रंगाची बनीयान तसेच, कत्थ्या रंगाची अंडरवियर घातलेली, डोक्याचे केस काळे—पांढरे अशा वर्णनाचे ईसम कुजलेल्या मृत अवस्थेत मिळून आले. मृतकाचे प्रेत उत्तरीय तपासणी करीता मेयो हॉस्पिटल येथे पाठविलेले आहे. मृतकाची अद्याप ओळख पटलेली नाही. मृतक ईसमास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे यशोधरानगर येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी ऋषभ अनिल पोटभरे, वय ३० वर्षे, रा. भिलगांव, पाण्याचे टाकीजवळ, यशोधरानगर, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून, पोलीस ठाणे यशोधरानगर येथे सपोनि. विलास पाटील यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे पारडी :—** दिपक अर्जुन पटेल, वय ३० वर्षे, रा. शाम नगर, पारडी, नागपूर हे दिनांक १०. ०५.२०२६ चे ११.०० वा. पासुन पोलीस ठाणे पारडी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी

निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—लांबट, बांधा—मध्यम, उंची—५ फुट १ इंच, केस— काळे, अंगात— निळ्या रंगाचा शर्ट व कत्थ्या रंगाचा फुलपॅन्ट घातलेले आहे. भाषा— मराठी व हिंदी बोलतात. ओळख— दोन्ही हातावर गोंदण आहे.

**२) पोलीस ठाणे पारडी :—** सचिन काशीनाथ सुदामे, वय ३५ वर्षे, रा. बाबा त्रिमुर्ती नगर, पारडी, नागपूर हे दिनांक १९.०५.२०२६ चे ०७.१५ वा. पासुन पोलीस ठाणे पारडी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—लांबट, बांधा—मजबुत, उंची—५ फुट २ इंच, डोळे—घारे, केस— काळे, अंगात— क्रिम रंगाचा फुलशर्ट व निळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेले आहे. भाषा— मराठी व हिंदी बोलतात. सोबत— ॲक्टीवा क्र. एम.एच. ३१ जि.ई. ०२५९ घेवुन गेले आहेत.




दिपक सचिन

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कार्पो. कोर्ट क्र. १, नागपुर. | ३०४०३४४ /२००५ | कलम ३७९, ३४ भा.दं.वि. | १) गुड्डु उर्फ साहील शिवरतनसिंह ठाकुर, रा. गोलालपुर, आझाद नगर, तह. शिवारा, जि. जबलपुर, म. प्रदेश. ह.मु.— रामेश्वरी रिंग रोड, अजय ठाकरेचे घरी किरायाने, अजनी, नागपुर.<br>२) अरविंद उर्फ रोहीत मोतीराम डेहारीया, रा. दमुहा, तह. जुवारदेव, जि. छिंदवाडा, ह.मु.— सुभाष नगर, कामगार कॉलोनी, बैजानकर चे घरी किरायाने, नागपुर. | ०५.०६.२०२६ |

**स्वा/—**

**( राहुल रोटे )**

**पोलीस उपनिरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**